# जिल्हा सेतु समिती कार्यालय, भंडारा

क्रमांक जिकाभं/अका/जिसेस/भंडारा/कावी/ 89 /2018 दिनांक :- जानेवारी, 2018 08/02/2018

प्रति,

संचालक,
माहिती व जनसंपर्क,
महासंचालनालय, नागपूर अमरावती विभाग,
जुने सचिवालय, पहिला माळा,
नागपूर.

**विषय :- कंत्राटी तत्वावर अभियंता, तात्रिक अधिकारी, स्थापत्य अधिकारी, लिपीक कम डाटा एन्ट्री ऑपरेटर, शिपाई यांची पदभरती**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने जिल्हा सेतू समिती मार्फत विविध कार्यालयातील जिल्हा, तालुका व ग्रामीण स्तरावरील कार्यालयाकरीता कंत्राटी पध्दतीने 11 महिन्यांकरीता अभियंता, तात्रिक अधिकारी, स्थापत्य अधिकारी, लिपीक कम डाटा एन्ट्री ऑपरेटर, शिपाई या पदाकरीता एकत्रित मानधनावर बाहयस्थ मनुष्यबळांची नेमणूक करावयाची आहे. सदरचे संबंधाने या सोबत जोडलेली जाहिरात वृत्तपत्रात प्रकाशित करण्याकरीता पाठविण्यात येत आहे. तरी सदर जाहीरातीला मोठया प्रमाणात खप असलेल्या एक स्थानिक दैनिक वर्तमान पत्रात व्यापक प्रमाणात प्रसिध्दी द्यावी ही विनंती.

1. मुळ कार्यालयाचे नांव व पत्ता व दुरध्वनी क्रमांक :- जिल्हा सेतू समिती, भंडारा यांचे कार्यालय दुरध्वनी क्रमांक. 07184- 252346
2. जाहीरात प्रकाशित करावयाची तारीख (अंतिम दिनांक) :- 09 /02/2018
3. प्रकाशित करण्याचा प्रकार :- नागपूर विभाग, नागपूर
4. संबंधित काम असलेला जिल्हा :- भंडारा
5. जाहिरात करिता प्रस्तुत वृत्तपत्र :- स्थानिक स्तरावरील एका मराठी दैनिकामध्ये
6. जाहिरात देयक कुणास सादर करावे :- निवासी उपजिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जि.से.स.
7. जाहिरात प्रत्येक वृत्तपत्रात किती वेळा :- एक वेळा
8. संचालक माहिती यांना वृत्तपत्रात फेरबदल करण्याचे अधिकार राहतील काय. :- नाही.

सहपत्र :- जाहिरातीचा मसूदा

(सुहास दिवसे)
अध्यक्ष
जिल्हा सेतू समिती, भंडारा

# जिल्हा सेतू समिती भंडारा

## कंत्राटी तत्वावर अभियंता, तांत्रिक अधिकारी, स्थापत्य अधिकारी, डाटा एन्ट्री ऑपरेटर, शिपाई यांची पदभरती

## जाहीरात

जिल्हा सेतू समिती मार्फत विविध कार्यालयातील जिल्हा, तालुका व ग्रामीण स्तरावरील कार्यालयाकरीता कंत्राटी पध्दतीने 11 महिन्यांकरीता अभियंता, तात्रिक अधिकारी, स्थापत्य अधिकारी, लिपीक कम डाटा एन्ट्री ऑपरेटर, शिपाई या पदाकरीता जिल्हा सेतू समिती, भंडारा च्या दिनांक 09/01/2018 रोजी झालेल्या ठराव क्रमांक- 3 नुसार एकत्रित मानधनावर कंत्राटी पध्दतीने बाहयस्थ मनुष्यबळाची पदनिहाय प्रतिक्षा यादी तयार करावयाची आहे. **सदरच्या प्रतिक्षा यादी नुसार देण्यात येणा-या नेमणूका या पुर्णत: कंत्राटी व तात्पुरत्या स्वरुपाच्या असून या नियुक्त्यामुळे कोणत्याही कायमस्वरुपी शासकीय सेवेसाठी उमेदवार पात्र ठरणार नाहीत.** तसेच पदसंख्ये इतके पदांकरीता प्रतिक्षा यादी तयार करुन जिल्हयातील विविध विभागांमार्फत ज्या-ज्या पदांकरीता कंत्राटी मनुष्यबळाची मागणी प्राप्त होईल त्यानुसार निवड झालेल्या उमेदवारांच्या प्रतिक्षा यादीमधुन पात्र उमेदवारांना कंत्राटी पध्दतीवर नियुक्ती दिली जाईल.

**इच्छुक उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा 43 वर्षे वयोमर्यादा राहील**

| अ क्र | पदाचे नांव | पदांची संख्या | कमाल मानधन | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| | अभियंता | 50 पदे | 12,000/- प्रति महा | स्थापत्य अभियांत्रिकी पदवीधर/ पदविका व MSCIT परिक्षा उत्तीर्ण तसेच संगणक हाताळण्याचे ज्ञान | शासकीय/निमशासकीय अथवा खाजगी संस्थेत काम करण्याचा 1 वर्षाचा अनुभव |
| 2 | लेखाधिकारी/ सहा. लखाधिकारी | 5 पदे | 12,000/- प्रति महा | किमान M. Com./ C. A.(Charter Accountant) परिक्षा उत्तीर्ण तसेच संगणक हाताळण्याचे ज्ञान | शासकीय/निमशासकीय अथवा खाजगी संस्थेत काम करण्याचा 1 वर्षाचा अनुभव |
| 3 | तात्रिक अधिकारी | 5 पदे | 11,000/- प्रति महा | किमान B.S.C. पदवी (कृषि/जिवशास्त्र) अथवा कृषी पदवी धारक | तुती लागवड संवर्धन व कोष उत्पादन योजनेच्या कामाचा अनुभव |
| 4 | स्थापत्य अधिकारी, | 5 पदे | 11,000/- प्रति महा | स्थापत्य पदवी/पदवीका धारक | शासकीय/निमशासकीय अथवा खाजगी संस्थेत काम करण्याचा 1 वर्षाचा अनुभव |
| 5 | लिपीक कम डाटा एन्ट्री ऑपरेटर | 50 पदे | 8,000/- प्रति महा | किमान HSC उत्तीर्ण व MS-CIT संगणक परिक्षा उत्तीर्ण व संगणक वापरण्याचे आणि हाताळण्याचे ज्ञान अनिवार्य | डाटा एन्ट्री पदाचा अनुभव अनिवार्य |
| 6 | शिपाई | 5 पदे | 6,500/- प्रति महा | HSC/ SSC उत्तीर्ण | --- |

वरील पात्रता व अर्हता धारण करणा-या इच्छुक उमेदवारांनी बायोडाटासह स्वत:ची माहीती विहीत नमुन्यातील अर्जात शैक्षणिक व अनुभवाचे साक्षांकित प्रमाणपत्रासह सचिव जिल्हा सेतू समिती जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, भंडारा येथे दिनांक 17/02/2018 पर्यंत सादर करावा. उशिराने प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**अर्जाचा नमुना जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा यांचे bhandara.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.**

(सुहास दिवसे)
अध्यक्ष
जिल्हा सेतू समिती, भंडारा

अर्जाचा नमुना

प्रति,

सचिव,
जिल्हा सेतू समिती
भंडारा

विषय :- ------------------------------------------------------------ पदाकरीता कंत्राटी तत्वावर नेमणूक

संदर्भ :- जाहीरात दिनांक ----------------------

1. अर्जदाराचे पुर्ण नांव :-
2. कायम वास्तव्याचा पत्ता :-
3. सध्याचा पत्ता :-
4. भ्रमणध्वनी क्रमांक :-
5. ई- मेल अॅड्रेस :-
6. जन्म तारीख :-
7. शैक्षणिक पात्रतेचा तपशिल

| अ. क्र. | पदवीचे नांव | विषय | महाविद्यालयाचे नांव | विद्यापिठाचे नांव | शेकडा गुण |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

7. कामाचा अनुभव :-

जिल्हा सेतू समिती मार्फत विविध कार्यालयातील जिल्हा, तालुका व ग्रामीण स्तरावरील कार्यालयाकरीता कंत्राटी पध्दतीने 11 महिन्यांकरीता अभियंता, तात्रिक अधिकारी, स्थापत्य अधिकारी, लिपीक कम डाटा एन्ट्री ऑपरेटर, शिपाई या पदाकरीता एकत्रित मासिक मानधनावर नियुक्ती केली जाणार असल्याचे मला ज्ञात आहे. सदर नियुक्ती कंत्राटी व तात्पुरत्या स्वरुपाची असून या नियुक्तीमुळे मी कोणत्याही कायमस्वरुपी शासकीय सेवेसाठी पात्र ठरणार नाही व तसा दावाही करणार नाही.शासकीय सेवेचे कोणतेही लाभ मला प्राप्त होणार नाहीत याची मला जाणीव आहे.

वर दिलेली सर्व माहीती सत्य व अचुक असून त्यामध्ये तफावत आढळल्यास दिलेली नेमणूक कोणत्याही टप्यावर रद्द होईल व मी शिक्षेस पात्र ठरेन याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-
दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी
(अर्जदाराचे पुर्ण नांव)